## संस्कार मंदिर संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, वारजे, पुणे - ५८
## विद्यार्थी विकास मंडळ
## "मराठी राजभाषा दिन" अहवाल २०१७ - २०१८

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचे संवर्धन करण्यासाठी व तिचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याकरीता संस्कार मंदिर संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय विद्यार्थी विकास मंडळातंर्गत मंगळवार, दि.२७/०२/२०१८ रोजी **"मराठी राजभाषा दिन"** साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे उदघाटन संस्कार मंदिर संस्थेचे अध्यक्ष श्री. दिलीप बराटे यांच्या हस्ते झाले. आपल्या उदघाटनपर भाषणात श्री. बराटे म्हणाले की, "मराठी भाषेचे संवर्धनासाठी आपण सर्वांनी विध्आयक कार्य करणे आवश्यक आहे. तसेच मराठी भाषेचे संवर्धन करत असताना माहिती तंत्रज्ञानही आवश्यक आहे".

सदर कार्यक्रमास अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष मा.श्री.श्रीपाल सबनीस प्रमुख व्याख्याते म्हणून हजर होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, "आजच्या आधुनिक काळात वाचनसंस्कृती वृध्दींगत होणे व आपण सर्वांनी दर्जेदार ग्रंथांचे वाचन करणे आवश्यक आहे".

सदर कार्यक्रमास संस्कार मंदिर संस्थेचे उपाध्यक्ष श्री.राजेंद्र कासार व सचिव श्री.विशाल थोरात प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप भोईटे यांनी मराठी भाषेचे महत्त्व यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.राजेंद्र थोरात, प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.प्रांजली विद्यासागर व आभारप्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.संतोष शिंदे यांनी केले.

Bidyasagar
विद्यार्थी कल्याण अधिकारी
(S.W.O.)
कला व वाणिज्य महाविद्यालय
वारजे-माळवाडी, पुणे-५८

PRINCIPAL
Arts & Commerce College
Warje-Malwadi, Pune-58

POCO
SHOT ON POCO M2